नियमीत दिवाणी दावा क्र. ६३/२०१६
किशोर रेवतकर/वासुदेव रेवतकर
नि.क्र.२३

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ लिलाबाई दामोदर रेवतकर यांचा शपथेवर जादाचा सरतपास वादीचे विधिज्ञ श्री एस.एन. नाफडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१. मी प्रस्तुतकामी पुराव्याचे जे शपथपत्र दाखल केले आहे त्यातील मजुकर खरा व बरोबर असून तो माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यावर मी सही केलेली आहे. दावा दाखल करण्यापुर्वी मी प्रतिवादीला माझ्या वकिलांमार्फत नोटीस पाठवली होती त्याची ऑफीस प्रत मी प्रस्तुतकामी दाखल केलेली आहे. त्यावर माझे वकील श्री. नाफडे यांची सही आहे. ती मी ओळखते. त्याला **नि.क्र. २६** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी प्रतिवादींना पोस्टाने नोटीस पाठवली होती. त्याची पोस्टाची मुळ पोच पावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. २७ व २८** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी पटवा–याने दिलेला वाद मिळकतीच्या नकाश्याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पटवा–याचा शिक्का व सही आहे. त्याला **नि.क्र. २९** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी वाद मिळकतीचा ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.क्र. ३०** देण्यात येते. माझे पती व प्रतिवादीमध्ये झालेल्या विक्रीपत्राचा मसुदा असलेला मुळ दस्त प्रस्तुतकामी दाखल केलेला आहे. त्यावर माझे पती व प्रतिवादीची सही आहे. त्याला **आर्टीकल ए** देण्यात येते.

**जादाचा सरतपात पुर्ण.**

**उलटतपास प्रतीवादीचे वकील श्री. यु.एन. घोरपडे यांच्या तर्फे शपथेवर सूरू**

२. हे म्हणणे खरे आहे की, आमची सर्वे क्र. २०३ ही शेती ७/१२ उता–यानुसार संयुक्तीक आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. २०३ मध्ये अद्याप वाटणी झालेली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, ते आपापले क्षेत्र वहिती करतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतकामी विक्रीपत्राचा जो मसुदा दाखल केलेला आहे तो तयार केला तेव्हा मी नरखेडला तो तयार करण्यासाठी आले नव्हते.

३. जेव्हा माझे पती व त्यांच्या भावामध्ये वाटणीपत्र करायचे ठरले होते तेव्हा माझे लग्न झाले नव्हते. त्यामुळे त्याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल ए कडील विक्रीपत्रासंदर्भात माझ्या पतीने प्रतिवादीला रक्कम रुपये

५५,०००/– दिल्याचे दाखवणारे आर्टीकल ए व्यतिरीक्त इतर कोणतेही कागदपत्र मी प्रस्तुतकामी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने प्रतिवादीला रक्कम रूपये ५५,०००/– माझ्या समक्ष दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने वाटणीपत्र न करता जाणीवपुर्वक विक्रीपत्राचा खोटा मसुदा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, त्या विक्रीपत्राच्या मसुद्यावर प्रतिवादीची दिशाभुल करून सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला प्रतिवादीचा वाद मिळकतीतील हिस्सा हडप करायचा होता त्यासाठी त्याने खोटया मसुद्याचे विक्रीपत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने प्रतिवादीला खोटया मजकुराची नोटीस पाठवलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीचा सन २००२ पासून ताबा आमच्याकडे असल्याचे व त्यावर रक्कम रूपये १,००,०००/– खर्च केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती व प्रतिवादीमध्ये वाद मिळकत विक्रीसंदर्भातील कोणताही व्यवहार कधीही झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीतील प्रतिवादीचा हिस्सा हडपण्याच्या दृष्टीने मी खोटा दावा दाखल केलेला आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक – १०.०३.२०२५**

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक – १०.०३.२०२५**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव– टी. एन. कांबळे (श्रेणी–३)**